**पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०२१-२२ चा ५१ वा वार्षिक अहवाल विधिमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-**

- पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे ५१ वा वार्षिक अहवाल तयार करुन संचालक महामंडळाने दिनांक २३.०९.२०२२ रोजी सदर लेखा अहवालस मान्यता दिली.

- तद्नंतर दिनांक ०३.१०.२०२२ रोजी सदर वार्षिक अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेण्याकरीता महालेखापाल कार्यालय ( लेखा परिक्षा ) मुंबई , यांचेकडे पाठविण्यात आला.

- सदर अहवालावर महालेखाकार ( वाणिज्यिक लेखापरिक्षा ), मुंबई यांचे अभिप्राय दिनांक २३.१२.२०२२ रोजी पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळास प्राप्त झाले.

- पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या भागधारकांनी सदर वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल दिनांक २०.०१.२०२३ रोजी स्विकृत केले.

- सदर अहवालाचे मराठीत भाषांतर करुन, इंग्रजी व मराठी प्रती छपाई करण्यासाठी दिनांक २३.०३.२०२३ रोजी पाठविण्यात आले व दिनांक ०३.०७.२०२३ छापून मिळाले.

- तद्नंतर पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्या., पुणे यांनी दिनांक १२ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये सदर अहवाल ( मराठी व इंग्रजी एकत्रित ) शासनास सादर केला आहे.

उपरोक्त कारणांमुळे पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्या., पुणे यांचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे ५१ वा वार्षिक अहवाल मा. विधिमंडळास सादर करण्यास विलंब झालेला आहे .

(संजय देगांवकर)
सहसचिव